निशाणी क्र.१८

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.१ चा सरतपासः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – नरसिंग नारायण बिरादार,

वय – ६० वर्षे, व्यवसाय– शेती,

राहणार – रा.सुमठाणा, ता.शिरुर अनंतपाळ, जि. लातूर .

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एन. मेहेत्रे यांचे मार्फत सुरुः–**

१. दिनांक ०१.०६.२०१९ रोजी पोलिसांनी मला पंचनामा करण्यासाठी बोलवले नव्हते. पोलीसांनी माझ्या समक्ष घटनास्थळ पंचनामा केला नव्हता. (आता मला प्रस्तुत कामातील दि. ०१.०६.२०१९ रोजीचा घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला) त्या घटनास्थळ पंचनाम्यावरील सही माझी नाही. त्यामध्ये काय लिहिले आहे हे मला माहित नाही. त्यामधील मजकुर आता मला वाचून दाखवण्यात आला. त्याप्रमाणे माझ्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा झालेला नाही.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याकारणाने अभियोग पक्षातर्फे भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार प्रश्न विचारण्याची परवानगी मागणेत आली. वस्तुस्थितीची पाहणी करता व साक्षीदाराचे विसंगत विधान बघता सदर परवानगी देणेत आली**.

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०१.०६.२०१९ रोजी पोलिसांनी मला मौजे सुमठाणा ता. शि. अनंतपाळ येथील शेषराव बिरादार यांच्या घरी घटनास्थळ पंचनामा करण्याकरिता बोलवले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे घटना ठिकाण मौजे सुमठाणा ता. शि. अनंतपाळ येथील शेषराव बिरादार यांच्या घरी होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझ्यासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला, मला वाचून दाखवला आणि त्यानंतर त्याच्यावर मी सही केली. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला मदत करण्याकरिता खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपी तर्फे अॅड. एस. ए. सबनीस यांनी नाकारला–**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत.**

Digitally signed by GUNJAVATE APARNA SHIVAJI
Date: 2026.04.17 17:10:23 +0530

**(श्रीमती.ए.एस.गुंजवटे)**

दिनांक–१७/०४/२०२६.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१,

निलंगा